# नैसर्गिक बदल कसे रोखणार?

हवामानातील बदल रोखण्यासाठी माणसाला करण्याजोग्या अनेक गोष्टी आहेत. त्याने प्रामाणिक प्रयत्न केले तर ते निश्चितच उपयुक्त ठरतील. माणसाने पृथ्वीचे वातावरण दूषित केले आहे. त्यात प्रदूषित घटक सोडून तो वातावरणाची आणखी वाट लावत आहे. या गोष्टींवर नियंत्रण मिळवले तर ते चांगलेच आहे. पण हे खरे असले तरी सर्वच गोष्टी माणसाच्या नियंत्रणात नाहीत. त्यापैकी प्रमुख गोष्ट म्हणजे हवामानात नैसर्गिकरीत्या होणारे बदल. गाथेच्या लेखमालेच्या सुरुवातीला आपण याबाबत माहिती घेतली. पृथ्वीच्या वातावरणात नैसर्गिकरीत्या अनेक बदल होत असतात. सूर्याची उष्णता बाहेर टाकण्याची क्षमता काही विशिष्ट काळानंतर कमी-जास्त होत राहते. त्यानुसार वातावरणात काही बदल झाले तर ते रोखणे आपल्या हातात नाहीत. पृथ्वीसुद्धा विशिष्ट काळानंतर आपला फिरण्याचा अक्ष बदलत असते. त्यानुसारसुद्धा पृथ्वीवर येणाऱ्या उष्णतेचे प्रमाण कमी-जास्त होते. ही बाबसुद्धा रोखणे आपल्या हातात नाही. अशाप्रकारे नैसगिकरीत्या घडणाऱ्या अनेक गोष्टी आहेत ज्यांच्यावर माणसाचे नियंत्रण नाही आणि भविष्यातसुद्धा ते मिळवता येईल, याबाबतही खात्रीलायक काही सांगता येत नाही. त्यामुळे या नैसर्गिक घटनांमुळे हवामानात होणारे बदल आपल्याला रोखता येणार नाहीत, हे वास्तव लक्षात घ्यायला हवे. लोकांना घाबरविण्यासाठी किंवा निराश करण्यासाठी हे वास्तव सांगितलं जातंय आहे, असे अजिबात नाही. पण या गोष्टी समजून घेतल्या तर माणसाच्या मर्यादा लक्षात येतात. त्यामुळे आपल्याला हवामानबदल रोखण्यात किती अडथळे आहेत हेही समजते. या सर्व गोष्टी समजल्या तर कदाचित आपण माणसाच्या हातात असलेल्या गोष्टींची तरी गांभीर्याने काळजी घेऊ शकू. पण आपल्या मर्यादा माहीत नसतील, तर ही काळजी घेतली जाणार नाही. म्हणूनच हे वास्तव सर्वांनी जाणून घ्यायला हवे.



प्रश्न- वातावरणात नैसर्गिकरीत्या होणारे बदल रोखणे माणसाच्या हातात आहे का?

(उत्तर- रविवार,७ डिसेंबरच्या अंकात)



MAHARASHTRA
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
प्रस्तुत
लोकसत्ता गाथा ज्ञानाची




**फळभाज्यांसाठी वापर करा कापडी पिशव्यांचा,**

**दुष्परिणाम ओळखा प्लॅस्टीक पॅकिंगचा**

प्लॅस्टीकमध्ये पॅकिंग केलेले पदार्थ वापरल्यास त्यातले जीवनसत्त्वं कमी होऊ शकतात. टाकाऊ प्लॅस्टीक पॅकिंगचा दुष्परिणाम पाणी,जमीन आणि उर्जेवरही होऊ शकतो.



**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**

website:http://mpcb.mah.nic.in

**गुरुवार, दि. ११.१२.२००८ सकाळी ७.४० वा. आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर जागर पर्यावरणाचा कार्यक्रम ऐका. पत्रसंवाद : रविराज गंधे.**